# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनाट क्रमांक ३१५-२२** **दिनांक १८/१०/२०२२**

## पोलीस मुख्यालयाच्या जागेमध्ये बहूउद्देशीय इमारत व जॉगिंग ट्रॅकच्या कामाचे मा. डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांच्या हस्ते भुमीपूजन.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस मुख्यालयाच्या बेव्हर्ली पार्क येथील जागेमध्ये दिनांक १८/१०/२०२२ रोजी मा. श्री विनय सहस्त्रबुध्दे, अध्यक्ष-भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (केंद्र सरकार) तथा माजी राज्यसभा सदस्य यांचे हस्ते जॉगींग ट्रॅक व बहूउद्देशीय इमारतीच्या बांधकामाचे भुमीपूजन करण्यात आले आहे. त्याचसोबत सदर जागी मान्यवरांच्या हस्ते वृक्षरोपणही करण्यात आले. वृक्षरोपणात आतापावेतो एकूण १२८ देशी झाडे लावण्यात आली आहेत. पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी महाराष्ट्र शासन व मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाकडे सतत पाठपुरावा करुन कार्यालयासाठी आणि पोलीसांच्या निवासस्थानासाठी जागा उपलब्ध करुन घेतली आहे. बेव्हर्ली पार्क येथील सर्वे क्र १२२ येथे २.२० हेक्टर (साडेपाच एकर) जागेमध्ये पोलीस वसाहत, राखीव पोलीस निरीक्षक यांचे कार्यालय, मोटार परिवहन शाखा व इतर कार्यालयाच्या इमारतींचे बांधकाम नियोजित आहे. त्या जागेवर तात्कालीन राज्यसभा सदस्य मा. श्री विनय सहस्त्रबुध्दे यांच्या खासदार निधीतून ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सदर निधीमधून जॉगींग ट्रॅक, कबड्डी मैदान, ओपन जिम, गोळा फेक मैदान अशा स्वरुपाचे काम करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे बेव्हर्ली पार्क येथील पोलीस मुख्यालयाच्या जागेमध्ये एमएमआरडीए च्या वतीने ४५०० स्क्वेअर फुट बांधण्यात येणाऱ्या दोन मजली बहुउद्देशीय इमारतीच्या बांधकामाचे भुमीपूजन करण्यात आले असून सदरची इमारत ही राखीव पोलीस निरीक्षक यांचे कार्यालय, नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना राहण्यासाठी निवास व इतर उपयुक्त कामासाठी वापरण्यात येणार आहे.

उपरोक्त भुमीपूजनाच्या कार्यक्रमप्रसंगी मा. आमदार श्री प्रताप सरनाईक, मा. आमदार श्रीमती गीता जैन, पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते, अपर पोलीस आयुक्त श्री श्रीकांत पाठक, मनपा आयुक्त श्री. दिलीप ढोले, श्री मधुकर खरात, मुख्य अभियंता (एमएमआरडीए), श्री विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), श्री अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ व इतर मान्यवर व्यक्ती उपस्थित होते.




मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
पोलीस बहुउद्देशीय इमारत (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे मार्फतीने) व
जॉगिंग ट्रॅक (खासदार निधी
भुमी पुजन समारंभ
मंगळवार, दिनांक
/२०२२ रोजी



---ooo---